आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - दुपारी  १.३० वाजता

२७ जानेवारी २०२५ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- देशाच्या ७६व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त देशोदेशीच्या नेत्यांनी दिलेल्या शुभेच्छांबद्दल प्रधानमंत्र्यांनी मानले आभार

- राष्ट्रीय छात्र सेनेच्या वार्षिक मेळाव्याला आज प्रधानमंत्री संबोधित करणार

- उत्तराखंडमधे आजपासून समान नागरी कायदा लागू

- अमेरिकेने इतर देशांसाठी आर्थिक मदतीचा ओघ थांबवला

**आणि**

- दक्षिण कोरियाचे वादग्रस्त राष्ट्राध्यक्ष यून सुक येओल बंडाच्या आरोपाखाली दोषी असल्याचा कोरियन न्यायालयाचा निवाडा

**<><><><><>**

देशाच्या ७६व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त जागतिक नेत्यांनी दिलेल्या शुभेच्छांबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आभार व्यक्त केले आहेत. फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन गेल्या वर्षी प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमाला उपस्थित होते. ही घटना दोन्ही देशांमधलं धोरणात्मक सहकार्य आणि दीर्घ मैत्रीचं प्रतीक होतं, असं मोदी यांनी मॅक्रॉन यांच्या समाजमाध्यमावरच्या पोस्टला उत्तर देताना म्हटलं आहे. आयर्लंडचे प्रधानमंत्री मायकल मार्टिन यांनी समाजमाध्यमावर दिलेल्या शुभेच्छा संदेशालाही प्रधानमंत्र्यांनी उत्तर दिलं आहे. भारत आणि आयर्लंड यांच्यातले संबंध लोकशाहीवरच्या

विश्वासावर उभे आहेत आणि भविष्यात ते आणखी बळकट होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज राष्ट्रीय छात्र सेनेच्या वार्षिक मेळाव्याला संबोधित करणार आहेत. दिल्लीत जनरल करिअप्पा परेड मैदानावर होणाऱ्या या मेळाव्याची यावर्षीची संकल्पना 'युवा शक्ती - विकसित भारत' अशी आहे. ८०० हून अधिक कॅडेट्स त्यात सहभागी होणार असून, राष्ट्र उभारणीसाठी एनसीसीची वचनबद्धता दर्शवणाऱ्या विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करतील. या कार्यक्रमात १८ मित्र देशातले १४४ कॅडेट्स देखील सहभागी होणार आहेत. शिक्षण मंत्रालय आणि आदिवासी व्यवहार मंत्रालयाच्या मेरा युवा भारत योजनेचे साडेसहाशे स्वयंसेवक विशेष पाहुणे म्हणून कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी काल इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष प्रबोवो सुबियांतो यांच्यासाठी गृह स्वागत समारंभ आयोजित केला होता. उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

<><><><><>

११ व्या संयुक्त आयोगाच्या बैठकीसाठी वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल आजपासून मस्कतच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर आहेत. भेटीदरम्यान गोयल ओमानचे वाणिज्य, उद्योग आणि गुंतवणूक प्रोत्साहन मंत्री कैस बिन मोहम्मद बिन मुसा अल युसेफ यांच्याशी चर्चा करतील. उभय

देशांचे मंत्री व्यापार, गुंतवणूक आणि जागतिक आर्थिक परिस्थितीवर चर्चा करतील. या भेटीमुळे ओमानसमवेत व्यापार आणि गुंतवणूक संबंधांबद्दल देशाची वचनबद्धता अधोरेखित होणार असून, उभय देशांतील संबंध अधिक मजबूत होण्यास मदत होईल, असं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं दिलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आजपासून ३ दिवसांच्या संयुक्त अरब अमिरातीच्या भेटीवर जात आहेत. या भेटीदरम्यान ते दोन्ही देशांच्या दृढ भागीदारीचा आढावा घेतील, तसंच परस्पर संबंध आणखी दृढ करण्याच्या नव्या क्षेत्रांबद्दल चर्चा करतील. परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांचा हा दौरा दोन्ही देशातली धोरणात्मक भागीदारी पुढे नेण्याची संधी देईल, तसंच परस्पर संबंधांना गती देईल, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या पत्रकात नमूद करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज उत्तर प्रदेशातल्या प्रयागराज इथं महाकुंभ मेळ्यात सहभागी झाले. त्रिवेणीसंगमावर स्नान केल्यानंतर ते पुरी आणि द्वारका इथल्या शंकराचार्यांची तसंच इतर संतांची भेट घेणार आहेत.

दरम्यान, परवा २९ तारखेला मौनी अमावस्येच्या पार्श्वभूमीवर भाविकांची गर्दी होण्याची शक्याता लक्षात घेऊन महाकुंभ मेळा क्षेत्रात वाहन प्रवेशाला बंदी आहे. गर्दीच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी तसंच जास्त गर्दी होणार नाही याची खात्री करण्यासाठी एकात्मिक नियंत्रण आणि सूचना

केंद्र सक्रिय करण्यात आलं आहे. आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी जास्त गर्दी असलेल्या भागात जलद प्रतिसाद पथकं तैनात करण्यात आली आहेत.

महाकुंभ मेळ्याचं औचित्य साधून महिला आणि बालविकास मंत्रालयाच्या वतीनं महिला सक्षमीकरण आणि महिलांचे अधिकार याविषयी जनजागृती करणारी दालनं उभारली आहेत. याबरोबरच देशभरातल्या कलाकारांनी तयार केलेली हस्तकला, विविध कलाकृती असलेली वस्त्र, जैविक उत्पादनं विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

**<><><><><>**

शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी आणि समृद्धीसाठी केंद्र सरकार हर तऱ्हेनं प्रयत्न करत असल्याचं केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी सांगितलं. ७६ व्या प्रजासत्ताक दिन कार्यक्रमात विशेष पाहुणे म्हणून आमंत्रित शेतकऱ्यांशी ते बोलत होते. शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी सरकार आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेत आहे, असं त्यांनी सांगितलं. ‘शेतातून थेट ग्राहकांपर्यंत’ या पद्धतीमुळे शेतकऱ्यांना दलालांच्या मध्यस्थीशिवाय आपला माल विकून उत्पन्न वाढवता येत आहे, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

अमेरिकेकडून इतर देशांना होणाऱ्या आर्थिक मदतीचा ओघ थांबवण्याचा निर्णय अमेरिकेने घेतला आहे. सध्याच्या आर्थिक मदतीचं पुनरावलोकन केल्यानंतर ती परराष्ट्र धोरणाशी सुसंगत आहे किंवा नाही, याची पडताळणी

केली जाणार आहे. त्यानंतरच मदतीविषयी पुढचा निर्णय घेतला जाईल, असे आदेश राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी दिले आहेत. त्यानुसार परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ यांनी आर्थिक मदतीचा ओघ पुनरावलोकनासाठी थांबवल्याची माहिती मंत्रालयाच्या प्रवक्त्या टॅमी ब्रुस यांनी दिली आहे. अमेरिकेनं २०२३ मध्ये १५८ देशांना सुमारे ४५ अब्ज डॉलर्सची मदत केली होती.

**<><><><><>**

उत्तराखंड मधे आजपासून समान नागरी कायदा लागू झाला. जात, धर्म आणि लिंगाधारित नागरी कायदे तसंच विवाह,घटस्फोट, वारसाहक्क आदी अधिकार सर्वांना समान असावेत यासाठी हा कायदा महत्त्वाचा आहे, असं मुख्यमंत्री पुष्कर सिंग धामी यांनी सांगितलं. लौकरच देशभरात समान नागरी कायदा लागू होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. समान नागरी कायद्याच्या अंमलबजावणी विषयी उत्तराखंड सरकारने तयार केलेल्या विशेष पोर्टलचं उद्घाटनही धामी यांच्या हस्ते झाले.

**<><><><><>**

कोलंबियावरच्या आयात शुल्काला विराम देण्याचा निर्णय अमेरिकेने घेतला आहे. अमेरिकेतून येणाऱ्या निर्वासितांच्या विमानांना कोलंबियात उतरण्यासाठी राष्ट्राध्यक्ष गुस्तावो पेट्रो यांनी सहमती दिल्यानंतर हा निर्णय घेतल्याचं व्हाईट हाऊसतर्फे जारी झालेल्या निवेदनात म्हटलं आहे. पेट्रो यांनी अमेरिकेहून येणाऱ्या निर्वासितांच्या स्थलांतराला विरोध केला होता. प्रत्युत्तरादाखल डोनाल्ड ट्रम्प यांनी कोलंबियाच्या आयातीवर २५ टक्के

शुल्क लादलं आणि आगामी काळात ते ५० टक्के करण्याचा इशारा दिला. त्यामुळे दोन्ही देशांमधल्या संबंधांमध्ये तणाव निर्माण झाला होता.

<><><><><>

दक्षिण कोरियाचे वादग्रस्त राष्ट्राध्यक्ष यून सुक येओल यांना, मागच्या महिन्यात त्यांच्या देशात झालेल्या बंडाचं नेतृत्व केल्या प्रकरणात, काल न्यायालयानं दोषी ठरवलं. देशात मार्शल लॉ लागू केल्यानंतर अशा आरोपांचा सामना करणारे ते पहिलेच राष्ट्राध्यक्ष आहेत. येओल यांच्यावर महाभियोग खटला देखील चालवला जात आहे. येओल यांना मदत केल्या प्रकरणात दक्षिण कोरियाचे संरक्षण मंत्री आणि काही पोलीस अधिकाऱ्यांना न्यायालयानं याआधीच दोषी ठरवलं आहे. येओल यांना राष्ट्र्ध्यक्ष पदावरून औपचारिकरीत्या दूर करण्याबाबत सध्या न्यायालय विचार करत आहे, तर नागरिक येओल यांच्यावर महाभियोग चालवण्याच्या मताचे आहेत.

<><><><><>

झारखंडमधल्या जामतारा जिल्ह्यात पोलिसांनी ६ सायबर गुन्हेगारांना अटक केली असून एक आंतरराज्य टोळी उघडकीस आणली आहे. सरकारी बँकांमधल्या खात्याच्या माहितीचा दुरुपयोग करून १० कोटी रुपयांहून अधिक रकमेची सायबर फसवणूक या प्रकरणी झाली असल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक एहतेशाम वकारिब यांनी आज दिली. या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू असल्याचं त्यांनी सांगितलं. यावेळी पोलिसांनी या टोळीकडून १४ मोबाईल, २३ सीम कार्ड, १० एटीएम, १ लॅपटॉप, २

दुचाक्या, १ ड्रोन कॅमेरा यासह एक लाख रुपयांहून अधिक रोकड जप्त केली आहे.

**<><><><><>**

खेलो इंडियाच्या हिवाळी स्पर्धांच्या पहिल्या टप्प्याची आज सांगता होत आहे. भारतीय लष्कर आणि भारत-तिबेट सीमा पोलिस दलाच्या पुरुष संघांमधे आईस हॉकीमध्ये आज अंतिम सामना होणार आहे. या स्पर्धेत महाराष्ट्राने दोन सुवर्ण, दोन रौप्य आणि चार कांस्य पदकं जिंकून, पदकतालिकेत अव्वल स्थान मिळवलं आहे.

**<><><><><>**

ऑसीटनी खुल्या टेनिस स्पर्धेत भारताचा युकी भांब्री आणि त्याचा क्रोएशियन जोडीदार इव्हान डोडिग यांचा सामना आज जर्मनीच्या मार्क वॉलनर आणि जेकब स्नायटर या जोडीशी होणार आहे. फ्रान्समधल्या माँटपेलियर इथं रात्री ८ वाजून ४० मिनिटांनी हा उपउपांत्यपूर्व फेरीचा सामना होईल.

**//<><><><><>//**